MHRT080001722017

**नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०१७**

**मधील निशाणी १५३ खालील आदेश**

वादीने सदरचा अर्ज हा आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २२ यांच्या निधनानंतर त्याचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी नि. १ येथील प्रतिवादी क्र २२ यांच्या नावासमोर मयत असे लिहिण्यास परवानगी देणे गरजेचे आहे. सबब मुळ दाव्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी याकरीता हा अर्ज केलेला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी हरकत घेवून त्याचे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे कथन केले आहे की न्यायालयाने न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश करण्यात यावेत.

३. नि. १४९, नि. १५१ खाली पारीत झालेल्या आदेशाअन्वये प्रतिवादी क्र. २२ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब हा माफ करण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र. २२ च्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करण्यात आला. त्याअन्वये मुळ दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २२ चे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. सबब दावा दुरुस्ती ही केवळ तांत्रिक स्वरुपाची आहे. यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट दावा दुरुस्ती नामंजूर केल्यास प्रतिवादी क्र. २२ चे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब केवळ औपचारीक दुरुस्ती असल्याने सदरची दावा दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते. सबब दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ रुल १७ प्रमाणे सदरची दावा दुरुस्ती मंजूर होण्यास पात्र आहे. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.14 17:53:36 +0530

## - आदेश -

१ अर्ज निशाणी १५३ मंजूर करण्यात येतो

२ प्र.वादी क्र. २२ यांच्या नावासमोर मयत असे नमुद करण्यास तसेच प्रतिवादी क्र. २२ चे वारस यांची नावे अभिलेखावरील मुळ दाव्यात दावा दुरुस्ती व्दारे नमुद करण्यास परवानगी देण्यात येते.

३ अर्ज नि. १४९, नि. १५१ ची पुर्तता केल्यानंतर सदरची दावा दुरुस्ती करण्यात यावी तसेच दुरुस्त दाव्याची प्रत त्वरीत अभिलेखावर दाखल करावी व त्याची प्रत विरुध्द पक्षास देणे

४ प्रतिवादी क्र. २२ यांचे वारस अभिलेखावर दावा दुरुस्ती व्दारे दाखल केल्यास त्याना दाव्याचे समन्स त्वरीत पाठविण्यात यावेत.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.14 17:53:42 +0530

**(श्रुती ह. पाटील )**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर**
**देवरुख**

**दि. १४/०७/२०२३**

-: **C E R T I F I C A T E** :-

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 47/2018 Exh |
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Jr. Clerk | : | T.N.Khade (Jr. clerk) |
| Court Name | : | Jt. Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 13/07/2023 |
| Order signed by Presiding Officer on | : | 13/07/2023 |
| Order uploaded on | : | 13/07/2023 |